## भगवान बाबा कला व वाणिज्य महाविद्यालय,
## लोणार जिल्हा बुलडाणा 443302

---

# Career Counseling & Competitive Exam Cell

2014–2015

### अहवाल

महाविद्यालयामध्ये पुस्तकी शिक्षणासोबतच स्पर्धा परिक्षा करिता लागणारे शिक्षण सुध्दा महाविद्यालयाने दयावे अशी चर्चा असतांना आपल्या महाविद्यालयात ह्या करिता एक समिती स्थापीत करावी. आवश्यक त्या वेळेस प्राध्यापक वर्गाने मार्गदर्शन करावे. करिता Carrer Councelling समितीची स्थापना करण्यात आली. ज्या मध्ये खालील सदस्यांची नियुक्ती करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष – | प्राचार्य. | श्री. डॉ. एस. जी. बडे |
| समन्वयक – | संचालक,शा शिक्षण | श्री. एस. जी. केला |
| सदस्य – | प्राध्यापक | श्री. आर. एन. बोरसे |
| | प्राध्यापक | श्री. व्ही. पी. भानुसे |
| | विद्यार्थी प्रतिनिधी | श्री. सुनील शिवाजी चव्हान बी.ए 1 |

महाविद्यालयाच्या सत्राला सुरूवात होते. त्या पासून काही अवधी सोडुन वर्गाची सुरवात करण्यात आली. विद्यार्थी वर्गाच्या प्रवेशाची प्रकिया सुरू करण्यात झाल्यापासून म्हणजे शक्यतो 1 जुलै पासून मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यत आले. ज्यामध्ये पोलीस/एस.आर.पी.एफ/ तलाठी,/ग्रामसेवक तसेच लिपीक, सहाय्यक कर्मचारी इत्यादि. वरिल सर्व परिक्षेच्या तयारीसाठी गणित,मराठी व्याकरण, इतिहास, भूगोल, विज्ञान, चालु घडामोडी इत्यादी विषयासबंधी माहिती देण्यात आली. गणित –विज्ञान याकरिता श्री. जोगड सर, मराठी व्याकरण इतिहास–भूगोल करिता श्री. अनिल राठोड सर, चालु घडामोडी तसेच मैदानी (शारीरिक) शिक्षणासाठी श्री. एस. जी.केला प्रमुख होते.

सदर वर्गाकरिता महाविद्यालयातील रूम नं 8 घेण्यात आली. 3 ते 5 हा टाईम ठेवण्यात आला. शारीरिक (मैदानी) शिक्षणासाठी 5 ते 7 टाईम ठेवण्यात आला. प्रवेशाची मर्यादा ही 50 ठेवण्यात आली. ह्या करिता महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थी सोबतच माजी विद्यार्थी वर्गाला प्रवेश देण्यात आला. प्रत्येक विद्यार्थी वर्गाकडे जातीने लक्ष ठेवण्यात आले. तसेच स्पर्धा परीक्षा संबंधीची तयारी करून घेण्यात आली. काही प्रमाणात पेपर घेण्यात आले. पेपरामधील ज्या चूका झाल्यात त्याचे सविस्तरपणे वर्णन करून समजवण्यात आले. ज्यामुळे विद्यार्थी वर्गाला चांगला फायदा झाला. काही विद्यार्थी वर्गानी यश संपादन करून आपली नेमणूक मिळवली.

या सर्व कार्यासाठी महाविद्यालयाचे संचालक मंडळ , प्राचार्य, प्राध्यापकवर्ग – प्राध्यापकेत्तर वर्गाचे अनमोल सहकार्य मिळाले.

B.B. College, Lonar Dist. Buldana

PRINCIPAL
Bhagwan Baba Arts & Commerce
College Lonar Dist. Buldana

# Career Counseling & Competitive Exam Cell

2015–2016

**अहवाल**

Career Counseling संबंधीचे वर्ग महाविद्यालयात दि.15 जुलै 2015 पासून दुपारी 3 ते 5 लेखी परीक्षा तयारी व 5 ते 7 वाजेपर्यंत शारीरिक (मैदानी) घेण्यात आले. वरिल वर्गामध्ये गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, मराठी व्याकरण, चालु घडामाडी इत्यादी चे मार्गदर्शन करण्यात आले. वरिल वर्गाकरिता चाणक्य मंडळ, आनंद पाटील, कोकीळा प्रकाशन, गायकवाड सर, चैताली प्रकाशन, इत्यादींचे पुस्तके वापरण्यात आली. वेगवेगळी नवीन मिळणाऱ्या पुस्तकांचा सुध्दा वापर करण्यात आला. गणित–विज्ञान करिता श्री. जोगड सर जे मागील 40 वर्षापासून लोणार येथील शिवाजी हायस्कुल ला गणित विषय शिकवित आलेले आहेत. मराठी व्याकरण, इतिहास, भूगोल करिता तांबोळा येथील अनिल राठोड सर तर चालुघडामोडी व शारीरिक शिक्षण (मैदानी विभाग)करिता श्री केला सर ह्यांनी मार्गदर्शन केलेत.

सदर वर्गाकरिता रूम नं. 8 चा वापर करण्यात आला असुन मैदनी विभागासाठी महाविद्यालयाचे मैदान तसेच जगप्रसिध्द खाऱ्यापाण्याचे सरोवर याचा वापर करण्यात आला. प्रवेशाची मर्यादा 50 ठेवण्यात आली. सर्व विद्यार्थी वर्गाकडे जातीने लक्ष दिल्या जात असल्याने वर्गातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेमध्ये चांगल्या प्रकारे यश संपादन करू लागलेत.लेखी परिक्षेच्या तयारीसाठी साप्ताहीक पेपर तसेच गटचर्चा पध्दत सुरूवात करण्यात आली. ज्याचा फायदा विद्यार्थी वर्गाला मोठ्या प्रमाणात झाला. जे पेपर घेण्यात आले होते त्याची उत्तरे काय व कशी आलीत ह्यांचे प्रात्यक्षिक दाखवून सर्वानी समजेल अशा पध्दतीने आखणी करण्यात आली. आपण जो पेपर सोडविला त्यामध्ये आपले काय चुकले व का चुकले हे समजविण्यात आले. त्यामुळे विद्यार्थी वर्गाला त्याचा फार फायदा झाला.

प्रत्येक हप्त्याला घेण्यात आलेल्या परिक्षापेपरचे मार्क सांगण्यात आले व त्यांचे पेपर त्यांना परत देण्यात आले. महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या जाहिरातीचा सखोल अभ्यास करून महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गानी विद्यार्थी वर्गास मार्गदर्शन केले. आवश्यक कागदपत्रे गोळा करण्यासाठी मार्गदर्शन केले. जाहीरातीनुसार योग्य महितीसह फॉर्म तसेच त्यास लागणारे शुल्क भरण्यात आले. यासाठी सुध्दा प्राध्यापकवर्गानी मार्गदर्शन केले.परीक्षेच्या कालावधीपूर्वी सर्व विषयांची लेखी परीक्षा घेण्यात आली. झालेल्या पेपरांची पाहणी, तपासणी करून चुकलेल्या प्रश्नाचे अचुक उत्तरे सांगण्यात आली. ज्यांचा फायदा विद्यार्थीवर्गाला मोलाचा झाला. विद्यार्थी वर्गाची यशसंपादन करण्याची संधी प्राप्त झाली. व आवश्यक त्या प्रमाणात मार्क मिळाल्याने विद्यार्थी वर्गाची नेमणूक त्या त्या विभागात प्राप्त झाली.

या सर्व कार्यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. वा. मा. फड, संचालक मंडळ, प्राचार्य, प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी वर्गाचे अनमोल सहकार्य मिळाले. सर्वात महत्वाचे योगदान म्हणजे वर्गासाठी शिक्षण देणारे शिक्षक होय

B.B. College, Lonar Dist. Buldana

PRINCIPAL
Bhagwan Baba Arts & Commerce
College Lonar Dist.Buldana

# Career Counseling & Competitive Exam Cell

2016–2017

## अहवाल

महाविद्यालयात पुस्तकी शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षा करिता आवश्यक शिक्षण देण्याकरिता दुपारच्या वेळेत म्हणजेच 3 ते 7 या दरम्यान स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यात आलेले आहेत. ह्या वर्गाची देखरेख अचुक व्हावी यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग तसेच विद्यार्थी वर्गाची नेमणुक करण्यात आलेली आहे. ह्यांमध्ये पुढील 2 वर्षाकरिता खालील समितीची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

अध्यक्ष – प्राचार्य. श्री. डॉ. एस. जी. बडे
समन्वयक – संचालक शा शिक्षण श्री. एस. जी. केला
सदस्य – प्राध्यापक श्री. आर. एन. बोरसे
श्री. अश्विनकुमार राठोड
विद्यार्थी प्रतिनिधी श्री. आकाश दिलीप राऊत बी.ए 3

Carrer Councelling संबंधीचे वर्ग महाविद्यालयात दि. 01/08 पासून दुपारी 3 ते 7 या वेळेत घेण्यात आले. 3 ते 5 या दरम्यान गणित–विज्ञान–इतिहास–भूगोल–मराठी व्याकरण–चालु घडामोडी, राज्यशास्त्र–नागरिकशास्त्र इत्यादी विषयासंबंधीचे मार्गदर्शन तज्ञ शिक्षकाकडून देण्यात आले. गणित, विज्ञान साठी श्री. जोगंड सर, मराठी व्याकरण करिता डॉ. गित्ते सर इतिहास–भूगोल करिता कु बिरामवार मॅडम राज्यशास्त्र व नागरिकशास्त्र करिता प्रा. कायंदे सर, चालु घडामोडी तसेच शारीरिक मैदानी शिक्षणाकरिता एस. जी. केला यांनी अथक परिश्रम घेवून अनमोल असे मार्गदर्शन केले.

सदर वर्गाकरिता महाविद्यालयातील प्रवेशित तसेच माजी विद्यार्थी ह्यांना अग्रक्रम देवून नोंदणी करण्यात आली. त्यांच्याकडून तसे लेखी अर्ज भरून घेण्यात आले. सर्व विद्यार्थी नियमितपणे येत असल्याने वर्गातील शिक्षण फार महत्वाचे ठरले.

लेखी परिक्षेच्या तयारीसाठी महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग आपल्या विषयासबंधीचे सखोल मार्गदर्शन नेहमी करीत आहे. श्री. भानुसे सर, श्री. गित्ते सर, मराठी व्याकरण, श्री. राठोड सर, इतिहास भूगोल, श्री. कायंदे सर, राज्यशास्त्र नागरिकशास्त्र. श्री. बोरसे सर अर्थशास्त्र सबंधीचे नेहमी मार्गदर्शन करीत आहे. ऐका सप्ताह मध्ये जे शिकविल्या गेलेत त्यावर गटचर्चा तसेच लेखी स्वरूपाने पेपर घेण्यात आले. घेण्यात आलेल्या पेपराची तपासणी करून त्यामधील ज्या चुका झालेल्या आहेत त्यापूर्णपणे समजावून सांगितल्यामुळे विद्यार्थीवर्गात त्याचा खूप फायदा झालेला आहे. आपणास मिळालेल्या मार्काची नोंदकरून ठेवण्यात आली. पुढील अभ्यासाकरिता त्यांचे पेपर त्यांना परत देण्यात आले. प्रत्येक सप्ताहाला गटचार्चा होत असल्याने आपणास माहित नसलेली माहिती सुध्दा प्रत्येक विद्यार्थी वर्गाला मिळत असल्याने त्याचा फायदा झाला.

वेळोवळी वर्तमानपत्रात आलेल्या जाहिरातीचे कात्रण वर्गात ठेवत असल्याने विद्यार्थी वर्गास प्रत्येक विभागाला कशी जाहिरात आली आहे याचे सखोल ज्ञान मिळाले. जाहिरातीचे शुल्क केव्हा व किती भरावे यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. वेळप्रसंगी काही विद्यार्थी वर्गाचे फॉर्म व शुल्क प्राध्यापक वर्गामार्फत भरण्यात आले.परिक्षेच्या कालावधीपूर्वी सर्व विषयांच्या लेखी परीक्षा घेण्यात आल्या 90 मिनिटे वेळ देण्यात आला व 100 मार्काची परिक्षा घेण्यात आली. सर्व विद्यार्थी वर्गाकडुन मिळालेल्या पेपरची तपासणी शिक्षकाव्दारे करून त्यातील चुका समजवण्यात आल्या. त्यांचा फायदा विद्यार्थी वर्गात पुरेपूर प्रमाणात झाला.

सदर कार्याकरिता संस्थेचे अध्यक्ष श्री. वा. मा. फड, संचालक मंडळ, प्राचार्य, प्राध्यापक–प्राध्यापकेत्तर वर्गाचे अनमोल सहकार्य मिळाले. विशेषतः वर्गामध्ये शिकविणारे श्री. जोगडसर, राठोड सर, बिरमवार मॅडम, केला सर डॉ. गित्ते सर यांचे योगदान महत्वाचे ठरले

PRINCIPAL
Bhagwan Baba Arts & Commerce
College Lonar Dist.Buldana

B.B. College, Lonar Dist. Buldana

# Career Counseling & Competitive Exam Cell

2017—2018

**अहवाल**

महाविद्यालयीन शिक्षणासोबतच आजच्या युगाला यशस्वी ठरविण्यासाठी स्पर्धा परीक्षा शिक्षण आवश्यक आहे. प्रत्येक पदवी किंवा इतर शिक्षणाने मिळणारी नौकरी आज रोजी स्पर्धा परीक्षा पास करून हस्तगत करावी लागत आहे. प्रत्येक मानवाला काही ऋण फेडावे लागतात. जसे माता–पिता ऋण, समाज ऋण. समाज ऋणाचा भाग म्हणुनच महाविद्यालयातील विद्यार्थीवर्गास शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षा पास करण्यासंबंधीचे मार्गदर्शन महत्वाचे होय.हे ध्येय महाविद्यालयाचे अध्यक्ष,संचालक मंडळ, प्राचार्य , प्राध्यापकवर्ग इत्यांदीनी समोरठेवुन स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन वर्ग महाविद्यालयात सुरू करण्यात आले. नावारूपाला असलेल्या समितीमध्ये दोन प्राध्यापक व 1 विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून यांची नियुक्ती सर्वानुमते करण्यात आलेली आहे.

Carrer Councelling विषयासंबंधीचे मार्गदर्शन मिळावे यासाठी महाविद्यालयाच्या आवारात दि.1 जुलै 2017 पासून सुरवातीला शारीरिक शिक्षणाचे धडे देण्यासाठी सुरवात करण्यात आले.

Sound Body in Sound Mind या म्हणीनुसार सुरवातीच्या 2 महिण्यापर्यंत शारीरिक कसरत करून घेण्यात आली. ज्यामध्ये Warmingup, Running, Skill इत्यादी करून घेण्यात आले. आपला Stamima पुरेपुर झाला तेव्हाच इतर कौशल्याला शिकविण्यास सुरवात केली. आवश्यक कौशल्याचा सराव करून घेण्यात आला. 1 सप्टेंबर पासून लेखी परीक्षेची तयारी म्हणून ह्यांचवर्गामध्ये गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, मराठी व्याकरण, अर्थशास्त्र, नागरिकशासस्त्र, राज्यशास्त्र, इंग्रजी व्याकरण, चालु घडामोडी इत्यादी विषयाचे मार्गदर्शन तज्ञ शिक्षकांकडून देण्यात आले. ज्यामध्ये गणित–विज्ञान करिता श्री.जोगड सर, मराठी व्याकरण श्री. डॉ. गित्ते सर, इतिहास भूगोल करिता श्री. राठोड सर, इंग्रजी व्याकरण श्री. नालींदेसर, राज्यशास्त्र–नागरिकशास्त्र यासाठी श्री.कायंदे सर, अर्थशास्त्र करिता श्री. बोरसे सर चालु घडामोडी तसेच मैदानी शिक्षणासाठी श्री, एस. जी. केला यांनी अथक परिश्रम घेवून विद्यार्थी वर्गास मार्गदर्शन केले.

वर्गाकरिता महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थी वर्गाला प्राधाण्य देण्यात आले. विशिष्ट प्रवेश फॉर्म भरून नोंदणी करण्यात आली. सोमवार ते शनिवार पर्यंत 3 ते 5 च्या दरम्यान लेखी परिक्षेसाठी आवश्यक असणारे वर्ग घेण्यात आले. 5 नंतर शारीरिक अभ्यास करून घेण्यात आले. ह्यांमध्ये Running, Warming up, Long jump, shot put, सबंधीचे कौशल्य शिकविण्यात आले. विद्यार्थी वर्गाकडून करून घेण्यात आले.

लेखी परिक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या अभ्यास कमाची माहिती महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग वेळोवेळी विद्यार्थी वर्गास देत असतात. आपला जो विषय आहे त्या सबंधी सखोल असे मार्गदर्शन करीत असतात. एका सप्ताहात जे शिकविल्या गेले त्यावर गटचर्चा, पेपर घेवून विद्यार्थी वर्गास उत्तेजीत केल्या जाते. पेपर तपासून त्यांची मार्कींग करून, चुकलेल्या प्रश्नाचे अचुक उत्तर सांगुन सखोल मार्गदर्शन करीत असतत. विद्यार्थी वर्गात स्पर्धा परिक्षेची भिती दुर

B.B. College, Lonar Dist. Buldana

PRINCIPAL
Bhagwan Baba Arts & Commerce
College Lonar Dist.Buldana

होते चांगले यश संपादन करीत आहेत. आपण सोडविलेला पेपर आपणास मिळात असल्याने आपणास किती मार्क आहेत. तसेच आपले काय चुकले त्याची संपूर्ण माहिती असल्याने पुढील वेळी होणाऱ्या चुकांची संख्या कमी होत आहे असे दिसून आले.

वेळोवेळी येणाऱ्या जाहिरातीचे कात्रण वर्गाच्या सूचना फलकावर लावण्यात येत असल्याने जाहिरातीसंबंधी माहिती पुरेपुर मिळत आहे. काही अडचण असल्यास प्राध्यापकवर्ग वेळोवळी विद्यार्थी वर्गास मार्गदर्शन करीत आहेत. काही प्रसंगी विद्यार्थी वर्गाजवळ स्पर्धा परिक्षेचा फॉर्म भरतांना शुल्काची कमतरता असल्यास प्राध्यापकवर्ग जातीने त्याचे शुल्क भरतात. व योग्य ते मार्गदर्शन करतात,

जाहिरातीनुसार होणाऱ्या भरतीचा जो अभ्यासक्रम आहे त्या आधारावर उचितवेळा व उचितमार्काचे पेपर घेण्यात येतात. होणाऱ्या पेपरांची तपासणी करून मार्काची नोंद करून, चुकीच्या प्रश्नाचे उत्तर सांगुन. समजावुन दिल्या जात असल्याने विद्यार्थी वर्गास त्यांचा फार फायदा होत आहे. स्पार्धा परिक्षेत यश मिळाल्याने त्यांना नेमणुकसुध्दा मिळत आहे. ह्यामुळे विद्यार्थी आपल्या परिवाराचे उत्पंन्न वाढविण्यास मदत करीत आहेत. आपली प्रगती करीत आहेत. असे म्हटल्या जाते की गावात, समाजात 1 व्यक्ती शिक्षीत होवून नौकरी पदावर आरूढ झाली तर गावाची, समाजाची प्रगति निश्चीत होते.

सदर वर्गाकरिता संस्थेचे अध्यक्ष श्री. वा. मा. फड, संचालक मंडळ, प्राचार्य, प्राध्यापक–प्राध्यापकेत्तर कर्मचारी, वर्गाला शिकविणारे श्री. जोगड सर, राठोड सर, केला सर, यांचे विशेष योगदान आहे तसेच वेळोवेळी महाविद्यालयात भेटी देणारे मान्यवराचे सुध्दा योगदान आहे.

PRINCIPAL
Bhagwan Baba Arts & Commerce
College Lonar Dist.Buldana

B.B.College, Lonar Dist.Buldana

## Career Counseling & Competitive Exam Cell
## 2018-2019

### अहवाल

महाविद्यालयाच्या शिक्षणासोबतच आजच्या युगात यशस्वी होण्याकरिता स्पर्धा परीक्षा शिक्षण आवश्यक आहे. आपणास मिळणारी नौकरी ही स्पर्धा परीक्षेच्या आधारावरच मिळत असल्याने स्पर्धा परीक्षेमध्ये यश संपादन करणे महत्वाचे ठरलेले आहे. सर्वांना यश मिळो यासाठी महाविद्यालयाचे अध्यक्ष, संचालक मंडळ, प्राचार्य, प्राध्यापकवर्ग अहोरात्र मेहनत करीत असुन विद्यार्थी वर्गास मार्गदर्शन करीत आहे.

Carrer Councelling विषयासंबंधीचे मार्गदर्शन वर्ग महाविद्यालयाच्या आवारात दि. 15 जुलै पासून सुरूवात करण्यात आले. सुरवातीला शारीरिक शिक्षण अंतर्गत Warming up, Weight Training Exercise देवून विद्यार्थी वर्ग शारीरिक विकास करण्यात आला विद्यार्थी वर्गामध्ये Stamina strength आल्यानंतर त्यांना Running Throwing Jumping चे Skill शिकविण्यात आले. त्यांचेपासून करून घेण्यात आले. दि. 1 सप्टेंबर पासुन लेखी विषयाच्या कार्याला सुरूवात करण्यात आली ह्यामध्ये गणित–विज्ञान करिता श्री. जोगड सर, मराठी व्याकरण करिता श्री. गिते सर, इतिहास–भूगोल करिता श्री. अश्विन राठोड सर, राज्यशास्त्र–नागरिकशास्त्र करिता श्री. कायंदे सर, अर्थशास्त्र करिता श्री. बोरसे सर, तसेच चालू घडामोडी मैदानी सरावकरिता श्री. केलां सर यांनी अथक परिश्रम घेवून विद्यार्थी वर्गास मार्गदर्शन केलेत. वळोवेळी प्राचार्य साहेबांनी पाहणी करून विद्यार्थी वर्गास मार्गदर्शन केलेत.

सदर वर्गाकरिता महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थी वर्गाचा समावेश करण्यात आला. प्रथम 50 येणाऱ्या विद्यार्थी वर्गाला प्रवेश देण्यात आला. ह्याकरिता विशिष्ट प्रवेश फॉर्म भरून घेण्यात आला सोबत त्यांचा फोटो घेण्यात आला. सोमवार ते शनिवार पर्यन्त 3 ते 5 या दरम्यान रूम नं 8 मध्ये विद्यार्थी वर्गाला तज्ञ शिक्षकांकडून मार्गदर्शन करण्यात आले. ह्या वर्गामध्ये विशिष्ट प्रकारचा अभ्यासकम राबविण्यात आला सर्व स्पर्धा परीक्षेकरीता उपयुक्त ठरला. प्राध्यापकवर्ग विद्यार्थी वर्गास नेहमी अभ्यासक्रमाची माहिती देत असल्याने विद्यार्थी वर्ग बाजारात उपलब्ध असणारी पुस्तके आपल्या परिने उपलब्ध करीत होती. एका सप्ताहात शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासकमा नुसार त्यांमध्ये गटचर्चा करून. पेपर घेवून त्यांनी दिलेल्या पेपरची तपासणी करून चुकलेल्या प्रश्नांची उत्तरे समजावून सांगत होते त्याचे पेपर त्यांना परत करत होते. ह्यामुळे विद्यार्थी वर्गात एक प्रकारची ओढ निर्माण होत होती. एकंदरित विद्यार्थी वर्गात परिक्षेसंबंधीची भिती दूर होत आहे. काही प्रमाणात ज्या विद्यार्थी वर्गास समजले नाही त्या विषयावर पुन्हा पुन्हा प्राध्यापक वर्ग मार्गदर्शन करीत होते.

वेळोवेळी येणाऱ्या जाहिरातीचे कात्रण वर्गामधील सूचना फलकावर लावण्यात येत असल्याने विद्यार्थी वर्गास जाहिरातीबद्दल सविस्तर माहिती मिळत आहे. काही अडचण असल्यास प्राध्यापकवर्ग विद्यार्थी वर्गास मार्गदर्शन करीत आहेत. काही प्रसंगी विद्यार्थी वर्गाजवळ स्पर्धा पीरक्षेचा फॉर्म भरतांना पैशाची कमतरता आल्यास प्राध्यापक वर्ग स्वतः पैसे देवून फॉर्म भरण्यास मदत, मार्गदर्शन करीत होते.

जाहिरातीनुसार घेण्यात आलेल्या भरतीचा जो अभ्यासकम आहे त्यानुसार ठराविक वेळ देवून पेपर घेण्यात आले. पेपर तपासणी करून योग्य उत्तरे सांगण्यात आली. पेपर परत करण्यात आले ज्यांचा फायदा विद्यार्थी वर्गास खुप झाला

सदर वर्गाकरिता संस्थेचे अध्यक्ष, संचालक मंडळ, प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, वर्गाला शिकविणारे शिक्षक ह्यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. तसेच वेळोवळी महाविद्यालयाला भेटी देणारे मान्यवरांचे सुध्दा योगदान मोलाचे ठरले.

B.B. College, Lonar Dist. Buldana

PRINCIPAL
Bhagwan Baba Arts & Commerce
College Lonar Dist.Buldana